# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

**९१) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.१३.०२.२०२६**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (०७/०२/२०२५ ते १३/०२/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१४/०२/२०२६ ते १८/०२/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.० | ३०.० | ३०.५ | ३०.८ | ३०.८ | ३२.० | ३१.८ | कमाल तापमान (अं.से.) | ३३ | ३३ | ३४ | ३३ | ३१ |
| १३.५ | १५.० | १३.२ | १३.५ | १५.६ | १५.० | १५.६ | किमान तापमान (अं.से.) | १६ | १६ | १७ | १६ | १५ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढग स्थिती (आकाश) | अ: ढगाळ | अ: ढगाळ | अ: ढगाळ | अ: ढगाळ | अ: ढगाळ |
| ७१ | ६९ | ८३ | ७२ | ६४ | ६३ | ५९ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७९ | ७३ | ७० | ६८ | ६८ |
| ३५ | ३७ | ४१ | ३८ | २८ | ३५ | ३३ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३० | २८ | २७ | २६ | २७ |
| ४.७ | ५.० | २.९ | २.६ | ४.१ | ४.० | ३.० | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १.८ | ३.६ | ५.२ | ३.१ | ४.८ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश**<br><br>**हवामान सतर्कता/इशारा:** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात हवामान कोरडे राहील. आकाश पुढील पाच दिवस अंशतः ढगाळ राहील. कमाल तापमान ३१-३४ डिग्री सें. व किमान तापमान १५-१७ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग १-५ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>**इशारा नाही** |
| **सामान्य सल्ला** | | कोबीवर्गीय पिके<br>बटनिंग<br>फुलकोबी, ब्रोकोलीमध्ये नेहमीसारखा गड्डा न धरता बटणासारखा अगदी छोटा गड्डा तयार होतो. पानांची वाढही खुंटलेली दिसते. हा दोष मुख्यतः नत्राच्या कमतरतेमुळे होतो, तसेच लवकर येणाऱ्या जाती उशिरा लावल्यामुळे गड्डा न भरता लहान राहतो.<br>उपाय<br>वाढ खुंटलेली, जुन रोपे पुनर्लागवडीस वापरायचे टाळावे.<br>नत्रयुक्त खतांचा योग्य पुरवठा करावा.<br>पाणी, आंतरमशागत, कीड व रोग नियंत्रण आदींबाबत योग्य काळजी घ्यावी.<br>हंगामाप्रमाणे योग्य जातींची निवड करावी. |
| **संदेश** | | **वाढते तापमान व कोरडे हवामान लक्षात घेऊन आंबा झाडाना प्रति झाड १५० ते २०० लीटर पाणी १५ दिवसाच्य अंतराने द्यावे.** |
| **रब्बी ज्वारी** | **कणसांमध्ये दाणे भरण्याची अवस्था** | ज्वारी पिकाच्या फुलोरा ते दाणे पक्व होण्याच्या अवस्थेत कणसातील अळ्या या किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. तसेच प्रादुर्भाव जास्त असल्यास झाड वाळते. अळ्या दुधाळ अवस्थेतील दाणे खातात. विष्ठेमुळे दाण्याची प्रत खराब होते. म्हणून २० अळ्या प्रति कणीस आढळल्यास, नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ ईसी २ मिली प्रति लिटर पाणी मिसळून याप्रमाणे फवारणी करावी.<br>पहिला पंधरवडा – पक्ष्यांपासून संरक्षण करावे (पक्षीथांबे /मचाण बसविणे). |
| **रब्बी मका** | **तुरे लागणेच्या अवस्था** | सिंचन<br>मक्याची पाने रुंद व लांब असतात. बाष्पीभवन क्रियेमुळे पानांतून अधिक पाणी बाहेर टाकले जात असल्याने या पिकास पाण्याची गरज अधिक असते. मका पीक पाण्याच्या ताणास संपूर्ण कालावधीमध्ये संवेदनशील आहे.<br>संवेदनशील अवस्थांच्या वेळी पाण्याचा ताण पडू देऊ नये, अन्यथा उत्पादनात लक्षणीय घट येते.<br>पीक फुलोऱ्यात आणि दाणे भरत असताना कमी अंतराने भरपूर पाणी द्यावे. म्हणजे कणसे भरण्यास मदत होते.<br>मका फुलोऱ्यात असताना जमिनीत पाण्याचे प्रमाण कमी असल्यास स्त्रीकेसर बाहेर पडण्यास उशीर झाल्यामुळे बीजधारणा कमी होऊन उत्पादन घटते. म्हणून पीक तुऱ्यावर आणि स्त्रीकेसर अवस्थेत असताना पाण्याची आवश्यकता अधिक असते. |
| **गहू** | **फुलोरा अवस्था / ओंबी लागणेची अवस्था** | सद्य:स्थितीत ओंब्या बाहेर पडल्या आहेत. अशावेळी वारा नसताना पाण्याची पाळी द्यावी. कारण त्यामुळे गहू लोळण्याची शक्यता असते. ओंब्या बाहेर पडल्यानंतर पिकास तुषार सिंचन पद्धतीने पाणी देऊ नये. कारण त्यामुळे गव्हाच्या दाण्यांची चकाकी कमी राहून दर्जात घट होते. |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| **हरभरा** | **फुलोरा ते घाटे लागणेची अवस्था** | हरभरा पिकावरील घाटे अळीचे एकात्मिक कीड नियंत्रणासाठी हरभऱ्यावरील घाटे अळीचा नियंत्रणासाठी रासायनिक कीटकनाशक क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी.@ २.५ मिली किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ एस.जी.@ ४ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून (सरासरी १० अळ्या प्रती झाड आढळून आल्यास) फवारणी करावी किंवा फुलोरा अवस्थेत असलेल्या हरभरा पिकाला ५% निंबोळी अर्क आणि त्यानंतर १५ दिवसांनी हेलीओकील ५०० मिली ५०० लि. पाण्यात मिसळून फवारावे.<br>हरभरा पिकांमध्ये जागोजागी पक्षीथांबे उभे करावेत.<br>पाण्याची सोय असल्यास हरभरा पिकाला घाटे भरण्याच्या अवस्थेत पाणी द्यावे. |
| **उन्हाळी भुईमुग** | **जमिनीची मशागत / पेरणी पूर्व तयारी** | जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात पेरणी करता येईल अशा बेताने पेरणीपूर्व ओलीत करावे.<br>भुईमुग पिकाचे सुधारित वाण जसे फुले उन्नती, टी.ए.जी.-२४, टी.जी.-२६, टी.पी.जे.-४१, जे.एल.-५०१ खरेदी करावे.<br>उन्हाळी भुईमुगाची पेरणी<br>१५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी परंतु तापमान १८ डिग्री सिल्सिअस पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त वाढत नाही तोवर पेरणी करू नये.<br>उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी हेक्टरी ५ टन शेणखत/ सेंद्रिय खत जमिनीत मिसळावे. |
| **द्राक्षे** | | <u>मण्यांचा दर्जा</u><br>या वर्षी थंडीचा प्रभाव असल्याने बहुतांश बागांमध्ये पाने तुलनेने छोटी राहिल्याचे दिसून येते. वाढीच्या सर्व अवस्था साधारण ८ ते १० दिवस उशिरा दिसल्या. मात्र मण्यांमध्ये मऊपणा अपेक्षेपेक्षा लवकर, म्हणजे छाटणीनंतर सुमारे ८० दिवसांत सुरू झाला आहे. त्यामुळे मण्यांची फुगवण आणि साखरेची वाढ अपेक्षेप्रमाणे होईल याबाबत साशंकता आहे.<br>ज्या बागेत काढणीसाठी अजूनही ३५ ते ४० दिवसांपेक्षा जास्त वेळ आहे, अशा बागेत साखरेची वाढ अपेक्षित मिळविण्यासाठी मण्यांची हलकी थिनिंग केल्यास फायदा होईल. विशेषतः बेदाण्यासाठी टीएसएस २२ पेक्षा जास्त लागतो. सध्याच्या परिस्थितीत टीएसएस २२ होण्यास जास्त वेळ लागेल. मार्च, एप्रिल महिन्यात पावसाळी वातावरण तयार होऊन बेदाणे सुकविण्याच्या काळाच आर्द्रता वाढल्यास बेदाण्याचा दर्जा खालविण्याची शक्यता आहे. |
| **डाळिंब** | | बुरशीजन्य स्कॅब, ठिपके आणि कुजवा यांसाठी काही आशादायक बुरशीनाशके जसे मॅण्डीप्रोपामीड, मेटीराम, प्रोपिकोनॅझोल, ॲझोक्सिस्ट्रॉबीन, ॲझोक्सिस्ट्रॉबिन + डायफेनोकोनॅझोल, क्लोरथॅलोनिल + मेटॅलॅक्झिल एम, बोर्डो मिश्रण ०.५ टक्के, कासुगामायसीन + कॉपर ऑक्सिक्लोराइड, झायनेब +हेक्झाकोनॅझोल, ट्रायसायक्लॅझोल + मॅन्कोझेब, क्लोरोथॅलोनिल, फ्लूओपायरम + टेब्यूकोनॅझोल, टेब्यूकोनॅझोल + ट्रायफ्लॉक्सीस्ट्रोबीन वरीलपैकी कोणत्याही बुरशीनाशकाच्या दोन ते तीन फवारण्या १० ते १४ दिवसांच्या अंतराने केल्यास चांगले परिणाम दिसून येतात. त्यामुळे पुढील अनेक फवारण्या टाळता येतात.<br>बोर्डो मिश्रणाव्यतिरिक्त प्रत्येक फवारणीत स्टीकर स्प्रेडर वापरावा.<br>एका हंगामात कॉपरयुक्त बुरशीनाशकाव्यतिरिक्त कोणतेही बुरशीनाशक दोनपेक्षा जास्त वेळा फवारू नये.<br>(वरील बुरशीनाशकाची फवारणी आपल्या जवळील संशोधन केंद्र / कृषी विद्यान केंद्रातील तज्ञ यांचा सल्ला घेऊनच करावे.) |
| **आंबा** | | <u>रोग नियंत्रण</u><br>भुरी रोगामुळे मोहोरावर पांढऱ्या बुरशीची वाढ दिसून येते. बुरशीची मुळे अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे मोहोर वाळून गळून जातो. लहान फळांच्या देठांवर ही बुरशीची वाढ होऊन फळे गळतात.<br>करपा रोगामुळे मोहोर तांबूस होऊन वाळतो. तसेच फूलगळ होते. लहान फळांवर काळे डाग पडून फळांची गळ होते.<br>करपा आणि भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी, ॲझाक्सिस्ट्रॉबिन (२३ एससी) १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. |
| **कांदा** | | रांगडा हंगामातील कांदा काढणीस तयार झाला असल्यास तीन आठवडे आधी कांद्याचे पाणी बंद करावे.<br>रबी हंगामातील कांदा पीक दोन महिन्याचे झाले असल्यास नत्र खताचा दुसरा हफ्ता द्यावा व पीक स्वच्छ ठेवावे.<br>कांदा पिकावरील फुलकिडे (थ्रीप्स) आणि करपा रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बोसल्फान २५ ईसी@ २ मिली + ट्रायसायक्लाझोल (७५ डब्ल्यूपी) १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारावे. फवारणी करताना चिकट द्रव्याचा वापर करावा. |
| **टोमॅटो** | | टोमॅटो पिकास खतांचा दुसरा हफ्ता द्यावा व पीक संरक्षणाचे योग्य ते उपाय योजावेत. आवश्यकतेनुसार अन्नद्रव्यांचा वापर करावा.<br>रबी हंगामातील टोमॅटो पीक फुलोरा अवस्थेत असल्यास खुरपणी करून शेत स्वच्छ करावे व खताची मात्रा द्यावी. टोमॅटो पिकास आधार देण्याचे काम पूर्ण करावे. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
# विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **पशुधन (गाय, म्हैस)** | | जनावरांच्या चा-यासाठी ज्वारी, मका व बाजरीची फेब्रवारी मध्ये पेरणी करावी.<br>पाण्याच्या उपलब्धतेनुसार उन्हाळी चारा पिकाची लागवड करावी.<br>जनावराना सकाळच्या थंडीपासून बचाव व संरक्षण करावे व गोठा कोरडा ठेवावा. गोठा कोरडा राहील याची कटाक्षाने काळजी घ्यावी. त्यासाठी दर ८ ते १० दिवसांनी गोठ्यामध्ये चुना भुरभुरावा. जनावरांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड/ सरकी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास फॅट आणि प्रथिनयुक्त आहार यांचा वापर वाढवावा. क्षार व जीवनसत्त्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरण्यासाठी नेताना सकाळी उशिरा न्यावे, जेणेकरून गवतावर दहिवर नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत.जनावरे धुवायची झाल्यास शक्यतो दुपारच्या वेळी धुवावीत. |
| **शेळी- मेंढी** | | तीन-चार करडे असणाऱ्या शेळीस दूध कमी असू शकते. अशा वेळी करडांना बाहेरून बाटलीने दूध पाजावे.<br>पाने तोडणाऱ्या करडांसाठी कप्प्यात हिरवा लुसलुशीत चारा टांगून ठेवावा. वाढीच्या वयाप्रमाणे कप्प्याची जागा वाढवावी आणि गटवारीनुसार करडे वेगळे करावेत. तीन महिन्यांनंतर नर व मादी करडे वेगळी करावीत.<br>अशक्तपणा आलेल्या करडांसाठी पशुवैद्यकाची मदत आणि उपचार आवश्यक असतात.<br>रात्रीच्या वेळी थंडी वाढत असल्याने छोटी करडे, कोकरे यांना निवारा करावा.<br>करडांची संख्या जास्त असल्यास गोठ्यामध्ये करडांना ऊब लागेल अशा उंचीवर २०० ते ५०० वॅटचे बल्ब लावावेत. |
| **कुक्कुटपालन** | | शेडमध्ये दोन्ही बाजूच्या जाळ्यांना पडदे लावावेत. हे पडदे रात्री व पहाटे थंड हवेच्या वेळी बंद करावेत. दुपारी थोडी उष्णता असते त्यावेळी पडदे उघडावेत.<br>कुक्कुटपालनात, शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन पिल्ले गरम ठेवा. |

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके, इगतपुरी

**दिनांक** : १३.०२.२०२६

**स्वाक्षरीत/-**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**
**तथा सहयोगी संशोधन संचालक,**
**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**